# नवी मुंबई महानगरपालिका

## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान पदभरती सन 2020-21

## राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम

आरोग्य विभाग, 3 रा मजला, नमुंमपा मुख्यालय, प्लॉट न.1,
से.15ए, किल्ले गावठाण जवळ, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई -400614

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे करार तत्वावर खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ क्र | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | मासिक एकत्रित वेतन | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वैद्यकिय अधिकारी - वैद्यकिय महाविद्यालय | 2 | **<u>Essential :</u>** - 1. MBBS or equivalent degree from Institution recognized by Medical Council of India; Must have completed compulsory rotatory internship<br>**<u>Preferential</u>**:- 1. Diploma/MD Public Health/PSM/Community medicine/CHA/Tuberculosis & Chest Diseases<br>2. One year experience in RNTCP<br>3. Basic Knowledge of computer. | खुला 38, राखीव 43, NHM कर्मचारी 5 वर्षे शिथिल, निवृत्त् शासकीय अधिकारी / विशेषतज्ञ 70 वर्षे व कर्मचारी 65 वर्षापर्यंत | रु. 40000/- | अ.जा-1<br>खुला -1 |
| 2 | औषध निर्माता | 1 | **<u>Essential</u>**: -<br>• Degree / Diploma in Pharmacy<br>**<u>Preferential</u>:-**<br>• 1 Year Experience in Managing drug store in reputed Hospital/Health centre recognized by Govt. | | रु. 14000/- | खुला -1 |
| 3 | लेखापाल | 1 | <u>Essential</u>: - 1.Graduate in Commerce.<br>2. Two years of experience in maintenance of accounts on double entry system n recognized Society or Institution<br>3.Experience in working with Accounting software for at least 2 years<br><u>Preferential</u>:- 1. Familiarity with audit in a recognized society or institute<br>2. MBA/PGD in financial management | | रु. 10000/- | खुला -1 |

### अटी व शर्ती

1) उपरोक्त् पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती सहा महिन्यांच्या कालावधी करीता राहील.
2) जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागू नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यांसंबंधित दावा करण्याचा अधिकारी राहणार नाही. सदरची कंत्राटी पदे ही नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात असतील.
3) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
4) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.
5) सेवानिवृत्त विशेषतज्ञ / कर्मचारी यांचे निवड झालेस सदर पदांकरीता मानधन राजय स्तरावरून प्राप्त विहित मार्गदर्शक सूचनांनुसार मोजमाप करुन अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
6) जाहिरातीमधील रिकत् पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेचे रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त्, नमुंमपा यांनी राखून ठेवले आहेत.

7) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल. विहित शैक्षणिक पात्रता नसल्यास सदरचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

8) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल व तद्नंतर पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील व निवड यादी प्रसिद्ध् करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

9) उमेदवारांना एकास पाच (1:5) याप्रमाणे घेण्यात येईल. जास्त उमेदवार झाल्यास छाननी अंती एका पदास पाच उमेदवार या्प्रमाणे पदानुसार पदवी/पदविका/फार्मासिस्ट इ. शैक्षणिक पात्रतेच्या अंतिम वर्षाच्या परिक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीस गुणांचा कट ऑफ लावण्यात येईल.

10) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवारांने कुठल्याही दबावतत्रांचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

11) जाहिरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी 38 वर्षे व मागास प्रवार्गासाठी 43 वर्षे राहील तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत असल्या 5 वर्षे वयोमर्यादा शिथिल करण्यात येईल.

12) वैदयकीय अधिकारी पदासाठी सेवानिवृत्त वैदयकीय अधिकारी व विशेषतज्ञ यांचेसाठी कमाल वयोमर्यादा 70 वर्षे, कर्मचारी यांचेसाठी 65 वर्ष कमाल मर्यादा राहील. तसेच शारीरिक व मानसिकदृष्टयासक्षम असल्याचे जिल्हा शैल्यचिकीत्सक यांचे वैदयकीय प्रमापण्पत्र सादर करणे बंधनकारक राहील. त्याचनंतर नियुक्ती आदेश देण्यात येईल.

13) विशेषतज्ञ/ कर्मचारी या पदांकरीता शासकिय सेवेतून सेवानिवृत्त / स्वेच्छा सेवानिवृत्त विशेषतज्ञ / अधिकारी या पदांकरीता अर्ज करीत असल्यास त्यांनी शाकीय सेवेत रूजू झालेला दिनांक, कार्यकाळ, पदनाम व निवृत्ती झालेले वर्षे, सेवानिवृत्तीचा दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवा निवृत्ती नंतर देय असलेले वेतन (पेन्शन) याबाबची संपूर्ण् माहीती अर्जामध्ये नमुद करावी.

14) शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोगय अभियान अंतर्गत असणाऱ्या अनुभवाचा विचार निवड प्रकीयेत करण्यात येईल.

15) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोईनुसार ठिकाण बदलवून मिळण्याचे मागणी करता येणार नाही.

16) उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदांकरीता वैदयकीय अधिकारी, औषध निर्माता इ. पदांकरीता तत्सम कौन्सिलकडून रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारास मुलाखतीस अपात्र ठरविले जाईल.

17) भरती प्रक्रिया स्थगित करणे / रद्द करणे / पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार आयुक्त, नमुंमपा यांचे स्थरावर राखीव ठेवण्यात आलेल आहेत. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.

18) मुलाखतीकरिता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

19) उमेदवारांने विहीत नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत प्रतिसह आपले अर्ज एक कोरा लिफाफा ज्यावर रु. 5/- टपाल तिकीट लावून स्वत:चे नाव व पत्ता प्रती वैदयकीय आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, 3 रा मजला, नमुंमपा मुख्यालय, प्लॉट न.1,से.15ए, किल्ले गावठाण जवळ, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई -400614 यांच्या नावे दि. 10/08/2020 ते दि. 25/08/2020 पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे. दि. 25/08/2020 नंतर प्राप्त अर्ज ग्राहय् धरले जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

20) सदरची भरतीची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर वर्षभरात भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजिनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीवरील उमेदवारास नवीन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील.

21) खलुा प्रवर्गासाठी 150/- रुपयेचा व राखीव प्रवर्गासाठी 100/- रुपयेचा डिमांड ड्राफ NMMC TB Control Society यांच्या नावे काढण्यात यावा. यांच्या नावे डिमांड ड्राफ नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

❖ खालील प्रमाणे आवश्यक असलेल्या मूळ कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या प्रती अर्जाच्या नमुन्यात जोडाव्यात.

1) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका
2) जातीचे प्रमाणपत्र
3) शाळा सोडल्याचा दाखला / जन्मतारखेचा दाखला
4) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे
5) पासपोर्ट आकाराचे 2 फोटो
6) शासकीय अनुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र
7) NMMC TB Control Society यांच्या नावे डिमांड ड्राफ
8) नावात बदल असल्यास पुरावा
9) आधारकार्ड
10) पॅनकार्ड

वैद्यकिय आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव
एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी
नवी मुंबई महानगरपालिका

अर्जाचा नमुना

______________________________ या पदासाठी अर्ज

पासपोर्ट
आकाराचा
फोटो चिकटवून
साक्षांकित करावे

प्रति,
वैद्यकिय आरोग्य अधिकारी,
नवी मुंबई महानगरपालिका

1) संपुर्ण नाव:- मराठी इंग्रजी (कॅपीटल लेटर)

| | | |
|---|---|---|
| 1) आडनाव | | |
| 2) स्वत:चे नाव | | |
| 3) वडिलांचे / पतीचे नाव | | |
| 4) आईचे नाव | | |

2) पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता (पिनकोड सहित) :-

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

3) दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रं.:------------------------------------ 4 ) ईमेल आयडी :- -----------------------------------------

5) जन्मतारीख :- ---------------------- दि. 01/08/2020 रोजीचे वय :- -------------

6) कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केलेला आहे, त्याप्रमाणे चौकटीमध्ये √ अशी खुण करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ. | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि. मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | आर्थिक मागास वर्ग | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

7) शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | विद्यापीठ / मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |
| 4 | | | | | |
| 5 | | | | | |

8) अनुभव :-

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

9) आपणा विरूध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालु आहे काय? असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा. होय / नाही

10) अर्जा सोबत खालील (छायांकित) सत्य प्रती जोडलेल्या आहेत.

1. 4.
2. 5.
3. 6.

11) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे का? होय / नाही.

मी, असे प्रमाणित करतो की , वर नमुद केलेली सर्व माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रदद् करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

सही /-
नाव ------------------------------------